दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३१८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१२ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यमंत्री बच्चू कडू यांना दोन महिने कारावास आणि दंडाची शिक्षा

**अमरावती : वृत्तसंस्था**

२०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकी प्रतिज्ञापत्रात मुंबई येथील सदनिकेची नोंद न केल्याप्रकरणी अमरावती जिल्ह्यातील चांदुर बाजार न्यायालयाने राज्यमंत्री बच्चू कडू यांना दोषी ठरवीत दोन महिन्याची शिक्षा आणि २५ हजार रुपये दंड ठोठावला. याप्रकरणी राज्यमंत्री बच्चू कडू तर्फे जामीन अर्ज सादर केला असता न्यायालयाने तो मंजूर केला आहे. तसेच अपील करता ३० दिवसाचा कालावधी देण्यात आला आहे.

अचलपूर मध्ये २०१४ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान राज्यमंत्री बचू कडू यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या नामनिर्देशन पत्रामध्ये परिशिष्ट अ मध्ये मालमत्तेची माहिती सादर करणे आवश्यक असते.

मात्र, राज्यमंत्री बचू कडू यांनी म्हाडाने निर्गमित केलेली मुंबई येथील सदनिकेची नोंद केली नव्हती. याप्रकरणी आसेगाव पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक अजय आखरे यांनी चौकशी करून प्रकरण न्यायालयात सादर केले होते.

# पनवेलमध्ये मनसेच्या मध्यवर्ती कार्यालयाचे अमित ठाकरेंच्या हस्ते उद्‌घाटन

### महिला सक्षमीकरणासाठी सदैव कटिबद्ध : अदिती सोनार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना महिला आघाडीच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन मनसेचे नेते अमित राज ठाकरे यांच्याहस्ते आज (शुक्रवार दि.११ फेब्रुवारी) पनवेलमधील ठाणा नाका रोड येथे करण्यात आले. रायगड मनसे महिला जिल्हाध्यक्षा आदिती सोनार यांच्या पुढाकाराने राजमाता जिजाऊ गड या नावाने पनवेलमध्ये मध्यवर्ती कार्यालय उभारल्याने मनसेच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा एकदा चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी आमदार राजू पाटील, नवी मुंबई अध्यक्ष गजानन काळे, स्नेहल जाधव, जिल्हाध्यक्ष अतुल भगत, विद्यार्थि सेना जिल्हाध्यक्ष अक्षय काशीद, अक्षय




सुतार, वर्षा पाचभाई, प्रिती खानविलकर, स्वरूपा सुर्वे, रुपाली मुरकुटे यांच्यासह मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी मनसे महिला जिल्हाध्यक्षा अदिती सोनार या म्हणाल्या की, आज समाजात महिलांना जगताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या अनुषंगाने मनसे महिला आघाडीच्या माध्यमातून महिलांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार आहोत. समाजात कुठेही महिलेवर अन्याय झाल्यास त्याठिकाणी सर्वप्रथम मनसे महिला आघाडी पोहोचलेली असेल अशी ग्वाही सर्व महिलांच्या वतीने देते. महिलांच्या कोणत्याही समस्या असल्यास त्या आमच्यापर्यंत तात्काळ पोहोचवा, जनसेवेसाठी कायम याठिकाणी आम्ही कटिबद्ध आहोत. महिलांसाठी अनेक योजना आहेत, परंतु अनेक महिला या योजनांपासून अद्यापही वंचित आहेत. महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजनांचा परिपूर्ण अभ्यास करून त्या महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी व महिलांना त्या योजनांचा सुलभतेने लाभ मिळवून देण्यासाठी विशेष पाऊल उचलले जाईल, असेही अदिती सोनार म्हणाल्या.

काही दिवसांपूर्वी महाविकास आघाडी सरकारने किराणा दुकानात वाईन उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला असून या निर्णयाला शंभर टक्के नकारघंटाच आहे. वाईन हा अल्कोहोलिक पदार्थ आहे. वाईन मधून कितीही सरकारला महसूल मिळणार असला तरीही इंधन, रस्ते यामधून मिळणारा कर सरकारला कमी पडतोय का? काही दिवसांनी 'गाव तिथे गुत्ता' अशी चिंताजनक परिस्थिती निर्माण होईल. या निर्णयामुळे तरुण पिढीचे भवितव्य उध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही, अशीही प्रतिक्रिया अदिती सोनार यांनी यावेळी व्यक्त केली.

## डोलवी एमआयडीसी प्रकल्प रद्द करा : आ.जयंत पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील प्रस्तावित डोलवी औद्योगिक विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूसंपादन होणार आहे. जेएसडब्लु कंपनीसाठी हे भुसंपादन होत असुन या भुसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध असुन डोलवी एम आय. डी. सी. प्रकल्प रद्द करावा अन्यथा जेएसडब्लु कंपनीचे गेट बंद केले जातील असा ईशारा आमदार जंयत पाटील यांनी गडब येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या सभेत दिला.

पेण तालुक्यातील डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव -गडब, डोलवी, वडखळ बोरी ग्रामपंचायत परिसरातील बेणेघाट, कोलवे, वावे, डोलवी, खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारघाट, खारचिर्बी, खारजांभेळा, खारढोंबी या गावातील २१०० एकर जमिन संपादित करण्यात येणार आहे. या भुसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध



दर्शविला असुन या संदर्भात गडब येथे शेतक- यांची सभा आयोजित

...//२

पेण तालुक्यातील प्रस्तावित डोलवी एमआयडीसी प्रकलपाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असुन शेतकऱ्यांच्या या मागणीला आमदार जयंत पाटील, आमदार रविशेठ पाटील यांनी पांठीबा दिला आहे, राज्याचे उद्यौग मंत्री सुभाष देसाई, उद्यौग रज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे रायगडचेच आहेत. दोन्ही आमदारांनी दोन्ही मंत्री महोदयांची सयुक्त बैठक घेवुन एमआयडीसी प्रकल्प रद्द करण्या बाबत सकारात्मक निर्णय घेवुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

**के. जी. म्हात्रे : संयोजक शेतकरी संघर्ष समिती**

## पनवेल शहरातील पाणी प्रश्नावरून शिवसेना आक्रमक ; पाणी पुरवठा बंद न करण्याचा दिला इशारा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरात व परिसरात आठवड्यातून एक दिवस प्रभागवार पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय पनवेल महानगरपालिका प्रशासनाने घेतला असून या निर्णयाचा शिव-सेनेने तीव्र विरोध करून कोणत्याही परिस्थितीत पाणी पुरवठा हा नेहमीच्या पद्धतीनेच सुरू ठेवावा अशी आक्रमक भूमिका घेतली असून याबाबतचा इशाऱ्याचे निवेदन आज पनवेल महानगरपालिकेकडे देण्यात आले आहे.

शिवसेना महानगर संघटक ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण, शहरप्रमुख प्रवीण जाधव, युवा सेनेचे पराग मोहिते, पनवेल शहर संपर्क संघटीका रुही सुर्वे, महिला आघाडी पनवेल शहर संघटीका अर्चना अनिलकुमार कुळकर्णी, युवा सेनेचे सनी टेमघरे, प्रसाद सोनवणे, शुभम माळी, शाखाप्रमुख अभिजीत साखरे, शैलेश जगनाडे आदींच्या पदाधिकारी व शिवसैनिकांनी यासंदर्भात पनवेल महानगरपालिकेला पत्र देवून पनवेल महानगरपालिकेद्वारे जलकुंभनिहाय आठवड्यातून एक दिवस पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर निर्णय हा स्थानिक वृत्तपत्रातून व रिक्षाद्वारे माहिती देवून नागरिकांना सुचित करण्यात आले आहे. याला शिवसेनेने विरोध करून पनवेल शहरातच रोजचे पाणी दिड तास मिळते तर त्याचा वेळ १५ मिनिटाने कमी करून होणारे एक दिवसाचा पाणी पुरवठा बंदचे धोरण बदलावे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पावसाचे प्रमाण चांगल्या प्रकारात झाले आहे. तरीही पनवेल शहरास पाणी पुरवठा करण्यास पालिका प्रशासन का कमी पडते आहे? हा पनवेलकरांना प्रश्न पडला आहे.

तरी या संदर्भात एक दिवस पाणी पुरवठा बंदचा निर्णय मागे घेवून पुर्वीप्रमाणे सुरळीत पाणी पुरवठा करावा अन्यथा शिवसेना आपल्या पद्धतीने रस्त्यावर उतरेल असा इशारा शहरप्रमुख प्रवीण जाधव यांनी दिला आहे.

## संक्षिप्त...

### आता बेस्ट बसमध्येही सीट आरक्षित करता येणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

खासगी वाहनांच्या धर्तीवर बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांमध्येही आसन आरक्षित करता येणार आहेत. ही सुविधा सध्याच्या 'चलो ॲप'द्वारे मिळेल अथवा त्यासाठी स्वतंत्र ॲप आणण्याचा बेस्ट प्रशासनाचा विचार आहे. ॲपच्या माध्यमातून बसचा मार्ग, वेळ समजताच त्यातील आसन आरक्षित करण्याची सोय उपक्रमाकडून प्रवाशांना उपलब्ध केली जाणार आहे. पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत प्रवाशांना ही सेवा उपलब्ध होणार आहे.

बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांमधून दररोज सुमारे २८ लाख प्रवासी प्रवास करीत असतात. मात्र सकाळच्या वेळेत बसगाड्या प्रवाशांनी भरुन जात असल्याने अनेकांची गैरसोय होत असते. सकाळी कार्यालय गाठण्याची धावपळ असल्याने काहीजण ओला, उबेर, खासगी टॅक्सी, शेअर रिक्षाने प्रवास करतात. अशा प्रवाशांसाठी खासगी वाहनांच्या धर्तीवर बेस्ट बसमध्येही आपले आसन आरक्षित करण्याची योजना प्रशासन आणणार आहे. त्यासाठी सध्याच्या ॲपमध्ये बदल करून किंवा स्वतंत्र ॲपद्वारे आसन आरक्षित करण्याची सुविधा दिली जाणार आहे. यामध्ये प्रवाशांना बसचा मार्ग, वेळ, त्या मार्गावर आणखी किती बससेवा असतील, याची माहिती मिळू शकेल. खासगी टॅक्सी कंपन्यांप्रमाणेच ही सेवा उपलब्ध होणार असून प्रवाशांना बसमधील आसन आरक्षित करता येणार आहे. या सेवांमध्ये फक्त वातानुकूलित बस चालवण्यात येणार आहेत.

## कार्यक्षम कार्यतत्पर पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्याप्रती महाड व पोलादपूर तालुक्यातील जनतेच्या भावना आदराच्या

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गेल्या वर्षभरामध्ये महाड आणि पोल-ादपूर तालुक्यातील आपत्ती काळामध्ये रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी भरपावसामध्ये केलेल्या मदतकार्यामुळे दोन्ही तालुक्यांतील जनतेच्या भावना आदरभाव व्यक्त करणाऱ्या असल्याचे मनोगत पोलादपूर तालुका महिला अध्यक्षा प्रतिभा पं.पवार आणि पोलादपूर शहर अध्यक्ष अजित खेडेकर यांनी व्यक्त केले.

राज्यामध्ये महाआघाडी सरकार स्थापन होण्यापूर्वीदेखील अदिती तटकरे यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा असताना पोलादपूर तालुक्यामध्ये विविध विकासकामे करून जनतेच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले.

पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील विकासकामांवेळी जनतेमध्ये मिसळताना आपुलकीचे स्थान निर्माण करणाऱ्या ना.अदितीताईंना प्रत्येक गावा-



घरांमध्ये आदराने 'ताई' अर्थाने आबालवृध्द तसेच समकालीनांकडूनही सन्मानाने वागविण्यात आले. राज्यामध्ये महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर या महाड विधानसभा मतदार संघामध्ये राज्यसरकारच्या पर्यटन तसेच विविध विभागांचा निधी आणण्यासोबतच जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातूनही विविध विकासकामे करणाऱ्या रायगडच्या पालकमंत्री म्हणून ना.अदिती तटकरे यांच्यासाठी संपूर्ण जिल्हा कार्यक्षेत्र असताना त्यांनी रायगडच्या कानाकोपऱ्यामध्ये पोहोचण्याची भुमिका राज्यातील महाविकास आघाडी सरकार सर्वस्तरात कामाद्वारे पोहोचविले आहे, असे पोलादपूर शहर अध्यक्ष अजित खेडेकर यांनी सांगितले.

कोरोना काळात गोरगरिबांना धान्य व अन्य मदतीचे किटस् वाटप करताना रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाट, पोलादपूर शहर, तालुक्यातील केवनाळे, साखर-सुतारवाडी, दाभिळ, कुडपण तसेच दरडग्रस्त क्षेत्रामध्ये सरकारी यंत्रणेद्वारे विविध आपत्तीनिवारणाची कामे करून तालुक्यातील ग्रामीण जनतेला सर्वतोपरी अन्न, वस्त्र तसेच तातडीच्या मदतीचे वाटप घडविले. खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री अदिती तटकरे आणि आ.अनिकेतभाई तटकरे यांनी रायगड जिल्ह्याच्या मदतकार्यात प्रत्यक्ष सहभागी होताना केंद्रात, राज्यात

...//२

## सुधागड तालुक्यातील उन्हेरे बुद्रुक येथे एका घराला आग

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील उन्हेरे बुद्रुक (धनगरवाडी) येथील राम धोंडू ढेबे यांच्या घराला अचानक आग ला-गली. या आगीत दोन लाखांहून अधिक रकमेचा मुद्देमाल व रोख रक्कम जळून खाक झाली आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.

या आगीत ५० किलो गहू, कपडे, ३ तोळे सोने, १ क्विंटल तांदूळ, १ कुलर, ४ प्लास्टिक बॅरल, इतर खाण्याचे पदार्थ, मुलांचे शैक्षणिक साहित्य असे मिळून तब्बल १ लाख ७८ हजारांचा मुद्देमाल व २३ हजार रुपये रोख रक्कम जळून खाक झाली आहे. त्यामुळे राम ढेबे यांचे तब्बल २ लाख १ हजार ५०० रुपयांचे नुकसान झाले आहे. एवढे मोठे नुकसान झाल्याने राम यांच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते.

तलाठ्यांनी लागलीच घटनास्थळी



जाऊन पंचनामा केला आहे. यावेळी पोलीस पाटील

...//२

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारती आल्या डबघाईला



**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरान मध्ये विविध खात्यांचे बंगले, वास्तू अनेक वर्षांपासून येणाऱ्या अधिकारी वर्गासाठी उपलब्ध आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे तीन जागी बंगले आहेत. निसर्गाच्या सानिध्यात गर्द वनराईत इंस्पेक्षण बंगला, माऊंट बंगला आणि एक हॉटेल बाईक समोर बंगला आहे. जुन्या काळातील बांधकाम केलेल्या या हेरिटेज वास्तू खूपच आकर्षक होत्या परंतु त्याकडे या खात्याचे दुर्लक्ष होत असल्याने त्या डबघाईला आलेल्या असून काही वर्षांतच त्या इतिहासजमा होतात की नाही अशी शंका व्यक्त केली जात आहे.

मागील काही वर्षांपूर्वी यातील काही बंगल्याची डागडुजी करण्यात आली होती. त्यानंतर इकडे कुणीही लक्ष केंद्रित केले नाही. केवळ ठेकेदारांना काम देण्यासाठीच की काय किरकोळ मलमपट्टी करण्यात आली होती. या वास्तू सुरू केल्यास संबंधीत अधिकारी वर्गाला तसेच त्या खात्यातील कर्मचारी यांना काही दिवस मुक्कामी राहता येऊ शकते. परंतु या खात्याची याबाबतीत काहीएक मानसिकता दिसत नसल्याने या सर्व वास्तू लवकरच डबघाईला येऊन निश्चितपणे इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहेत.

## कुपोषणमुक्त मुंबईसाठी ७१ नागरी बाल विकास केंद्रे कार्यान्वित : ॲड.यशोमती ठाकूर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईत एकूण ७१ नागरी बाल विकास केंद्र कार्यान्वित करण्यात आली असल्याची माहिती, महिला व बाल विकास मंत्री ड. यशोमती ठाकूर यांनी दिली आहे. पहिल्या चेंबुर नागरी बाल विकास केंद्र येथून प्रातिनिधिक स्वरूपात या केंद्रांचे उद्घाटन एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त श्रीमती रुबल अग्रवाल यांच्या हस्ते झाले. मुंबईतील एम पूर्व व एम पश्चिम या प्रभागांतर्गत चेंबुर, गोवंडी, शिवाजीनगर, मानखुर्द, ट्रॉम्बे व मुलुंड पूर्व या ६ प्रकल्पांमध्ये एकूण ७१ नागरी बाल विकास केंद्र कार्यान्वित झाले आहेत.




एकात्मिक बाल विकास सेवा योजनाअंतर्गत मुंबई विभागात एकूण ३३ बाल विकास प्रकल्प कार्यरत आहेत. यामध्ये ५ हजार १३० अंगणवाडया नागरी झोपडपट्टी क्षेत्रात सुरू आहेत. मुंबईतील एम पूर्व व एम पश्चिम या प्रभागामध्ये अति कमी वजनाच्या मुलांचे प्रमाण जास्त असल्याचे समजल्यानंतर या मुलांवर उपचार करण्यासाठी ऑगस्ट २०२१ मध्ये शताब्दी रुग्णालय, गोवंडी या ठिकाणी पोषण पुनर्वसन केंद्र (एनआरसी) सुरू करण्यात आले होते. यामध्ये मुलांचे वजन, उंची, दंड घेर याची बालरोग तज्ञांकडून तपासणी करून, अति तीव्र कुपोषित मुलांची नोंद करण्यात येते व या मुलांच्या पालकांना आहार तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येते.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या माध्यमातून ऑगस्ट ते डिसेंबर २०२१ अखेर एकूण ११०० मुलांची तपासणी केली असता ३७३ अति तीव्र कुपोषित मुले आढळून आली. मुलांचे अंगणवाडी क्षेत्रातच श्रेणीवर्धन व वाढ होण्याकरिता ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या ग्राम बाल विकास केंद्राच्या धर्तीवर नागरी भागात नागरी

...//२

# वीर पत्नी लक्ष्मीबाई यशवंतराव घाडगे यांचे शंभराव्या वर्षी वृध्दापकाळाने निधन





**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव पाटणुस येथे वयाच्या शंभराव्या वर्षी वृध्दपकाळाने वीरपत्नी लक्ष्मीबाई घाडगे यांचे शुक्रवार दि. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी सव्वा आठचे सुमारास त्यांचे राहते घरी निधन झाले. त्यांच्यावर आज सायंकाळी ०५.०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. यावेळी पुणे येथुन आर्मीचे जवान व अधिकारी हजर राहणार असुन मरणोत्तर व्हिक्टोरिया क्रॉस विजेते यशवंत घाडगे यांच्या वीर पत्नीस त्यांच्या तर्फे मानवंदना देण्यात येणार आहे.

यशवंत बाळाजी घाडगे यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यात पळसगाव-आंब्रेची वाडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव विठाबाई होते. वडील बाळाजीराव हे गरीब शेतकरी होते. या जोडप्याला दोन मुले व चार मुली अशी सहा अपत्ये होती. यशवंत अवघ्या तीन महिन्यांचा असताना त्याच्या वडिलांचे निधन झाले. त्यांचे निधन होण्यापूर्वी यशवंतचा मोठा भाऊ वामन हा सैन्यात भरती झाला होता. त्यामुळे त्याचा तुटपुंजा पगार हाच या कुटुंबाचा आधार होता. कुटुंबाचा गाडा ओढण्यासाठी विठाबाईंना शेतात काम करावे लागले व मोलमजुरी करावी लागली. यशवंतने शिकून पुढे चांगले नाव कमवावे असे त्यांना वाटत होते.

त्यामुळे यशवंतला त्यांनी पळसगावच्या मराठी शाळेत घातले. वयाच्या अकराव्या वर्षी यशवंत मराठी चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाला. उच्च शिक्षणासाठी शहरात जाणे हे गरिबीमुळे अशक्य होते. त्यामुळे यशवंत लोकांच्या शेतांवर मोलमजुरी करू लागला. सहा वर्षांनंतर थोरला भाऊ वामन निवृत्त होऊन गावी परतला, तेव्हा आपणही भावाप्रमाणे सैन्यात जावे असे यशवंतला वाटू लागले. तसा त्याला लाठी, बोथाटी व दांडपट्टा फिरवणे व कसरत करण्याची आवड होती. त्याची शरीरयष्टी सडपातळ, काटक आणि मजबूत होती.

मात्र यशवंतने सैन्यात जावे असे विठाबाईला वाटत नव्हते. पण वामनचा आग्रह व यशवंतचा निग्रह यांमुळे विठाबाईचा नाइलाज झाला. यशवंतने लग्न केल्यास आपण त्याला सैन्यात जाण्यास परवानगी देऊ अशी अट विठाबाईने घातल्यामुळे यशवंतला लग्न करावे लागले.

पाटणूसच्या पांडुरंग महामुणकरांची कन्या लक्ष्मीबाई हिच्याशी त्याचा विवाह झाला. दुसर्या महायुद्धाचे वारे वाहू लागल्यावर सैन्यात भरती सुरू झाली. तेव्हा १९३८ साली यशवंत घाडगे पाचव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये साधे शिपाई म्हणून दाखल झाले. त्यांनी कडक सैनिकी प्रशिक्षण घेऊन आपल्यावर सोपविलेल्या लहानमोठ्या कामगिर्या व विशेष अवघड जबाबदाऱ्या अतिशय कौशल्याने व तत्परतेने पार पाडल्या. त्यांच्या अंगभूत गुणांमुळे त्यांना लवकरच नाईक पदावर बढती मिळाली. दुसर्या महायुद्धात ब्रिटिश फौजां सोबत लढण्या साठी पाचव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीला इटलीत पाठविण्यात आले.

तेथे ब्रिटिश फौजेला इटली व जर्मनीच्या फौजेशी लढायचे होते. १० जुलै १९४४ रोजी जर्मन सैन्याच्या एका तुकडीसोबत नाईक यशवंतरावांच्या सैन्याची गाठ पडली. दोन्ही बाजूंनी बंदुका, टॉमीगन्स, तोफा धडधडू लागल्या. शत्रूच्या ताब्यात असलेले ठाणे जिंकून घेण्याच्या ईर्ष्येने मराठा पलटण पुढे सरकत होती. यशवंत घाडगे यांनी हातबाँब फेकून शत्रूची मशीनगन बंद पाडली. ठाण्याचे रक्षण करणारे अनेक जर्मन सैनिक त्यांनी यमसदनी पाठविले. आपल्याच कैफात घाडगे पुढे सरकत चालले होते.

अचानक आपल्याकडील काडतुसे व हातबाँब यांचा साठा संपल्याचे त्यांच्या लक्षात आले. आता ते ठाण्याच्या अगदी जवळ आले होते. त्यांनी मग मागचा-पुढचा विचार न करता आपली बंदूक उलट धरून शत्रूच्या सैनिकांवर झेप घेतली. बंदुकीच्या दस्त्याने हाणामारी करून ते शत्रुसैनिकांना लोळवू लागले. त्यांचा त्वेष पाहून शत्रुसैनिक माघारी पळू लागले. त्यांच्या पलटणीने शर्थ करून ते ठाणे काबीज केले. आपला विजय झाल्याचे लक्षात आल्यावर घाडगे यांनी क्षणभर थांबून मोकळा श्वास घेतला. त्यांचा संपूर्ण देह रक्ताने न्हाला होता. ते शांतपणे उभे राहिल्याचे पाहून जवळच्या खंदकात लपलेल्या एका जर्मन सैनिकाने संधी साधून त्यांच्यावर गोळी झाडली. या गोळीने अचूक वेध घेतला व घाडगे खाली कोसळले. क्षणार्धात त्यांची प्राणज्योत मावळली.

ब्रिटिश सरकारला त्यांच्या या पराक्रमाची दखल घ्यावी लागली. लाल किल्ल्या समोरील मैदानात भरलेल्या दरबारात त्यांना 'व्हिक्टोरिया क्रॉस' हा सर्वोच्च सन्मान मरणोत्तर प्रदान करण्यात आला. व्हाइसरॉय आणि गव्हर्नर जनरल फील्ड मार्शल लॉर्ड वेव्हेल यांच्या हस्ते घाडगे यांच्या वीरपत्नी लक्ष्मीबाईंना हे मानाचे पदक प्रदान करण्यात आले. या वीर पत्नीच्या पश्ताच कोणीही नसुन नातेवाईक व त्यांचे भाचे लक्ष देतात. ऐन तारुण्यात त्याकाळी लहान वयातच वीर पत्नी लक्ष्मीबाईंच्या नशिबी वैधव्य आले. नाईक यशवंतराव घाडगे यांच्या स्मरणार्थ माणगांवच्या मामलेदार कचेरी जवळ त्याकाळी त्यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. तेथे दरवर्षी ९ जानेवारीला 'घाडगे महोत्सव' साजरा करण्यात येतो. आज याच ठिकाणी माणगांवकर व वीर यशवंत घाडगे माजी सैनिक संघटनेच्या मागणी वरुन प्रांत प्रशाली दिघावकर यांच्या कार्यकालात पालकमंत्री आदिती ताई तटकरे यांच्या पाठपूराव्या मुळे अत्यंत देखणे स्मारक माणगांव येथे उभे राहिले असुन यंदा या ठिकाणी ९जानेवारी रोजी कोव्हिड परिस्थितीमुळे अत्यंत साधेपणात घाडगे उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी जास्त वयोमान असल्याने व प्रकृती अस्वास्थ्यामुळे लक्ष्मीबाई या कार्यक्रमास यंदा हजर नव्हत्या.

आपल्या शहिद पतीचे नव्याने जिर्णोध्दार झालेल्या देखण्या स्मारकाचे दर्शन मात्र त्यांना घेता आले नाही. लहान वयातच वैधव्य नशिबी आले, मुलबाळं न झाल्याने उभे आयुष्य न डगमगता स्वावलंबनाने एकाकी खडतर आयुष्य जगणाऱ्या माणगांव येथील शहीद वीर यशवंतराव बालाजी घाडगे यांच्या वयोवृद्ध पत्नी लक्ष्मीबाई घाडगे यांना व्यवस्थित निवृत्तीवेतन मिळत नव्हते याची शासन स्तरावर दखल घेत तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी, वीर पत्नी लक्ष्मीबाई यांच्याकडे दुर्लक्ष होत असल्याच्या एका बातमीच्या अनुषंगाने माणगांव तहसीलदार प्रियंका आयरे यांना प्रत्यक्ष भेटून त्यांना कुठल्या अडचणी येत आहेत, याविषयी विचारणा करण्यास सांगितले होते.

तहसीलदार प्रियांका आयरे यांनी पाटणूस येथे जाऊन प्रत्यक्ष भेट घेतली. वीर पत्नी लक्ष्मीबाई या १०० वर्षांच्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर प्रियांका आयरे यांनी पाटणूस येथे जाऊन त्यांची व्यवस्थित विचारपूस केली व वैद्यकीय उपचार मिळत आहेत किंवा नाही ते पाहिले. सध्या त्यांच्यावर कौटुंबिक डॉक्टरांकडून उपचार सुरू आहेत. लक्ष्मीबाई यांना स्मृतिभंशाचा आजार असून सध्याचे उपचार पुरेसे आणि योग्य आहेत, असे त्यांचा सांभाळ करणाऱ्या नातेवाइकांनी सांगितले होते. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहिती नुसार वीरपत्नी लक्ष्मीबाई यांना १३ हजार २५० निवृत्तीवेतन आणि मुख्यमंत्री निधीतून तितकेच म्हणजे १३ हजार २५० असे एकूण २६ हजार २५० रुपये मासिक वेतन मिळते, यातून त्यांचा उदरनिर्वाह चालतो. माणगांवातील शहीद वीर यशवंतराव बालाजी घाडगे यांचे स्मारक देखील सुस्थितीत आहे, या ठिकाणी त्यांचा जन्मोत्सवदेखील व्यवस्थित पार पडतो, अशी माहिती तहसीलदार आयरे यांनी त्यावेळी दिली होती.

वीर पत्नी लक्ष्मी बाईंचे आज अंतिम-संस्कार नंतर दि. १३ फेब्रुवारीला त्यांचे सावडणे व २० फेब्रुवारी रोजी दशपिंडी विधी व २३ फेब्रुवारीला उत्तरकार्य संपुर्ण विधी त्यांचे राहात्या घरी पाटणुस येथे होणार असल्याची माहीती मिळाली आहे.

# कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ३८,६०० ठेवीदारांचे पैसे मिळणार




**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ठेवीदारांना त्यांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ठेवीदार विमा संरक्षण मंडळाने कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या बँक ऑफ बडोदा या खात्यामध्ये तब्बल ३७४ कोटी रुपये जमा केल्याची बातमी खात्रीलायक सूत्रांकडून समजते. ठेवीदारांना दिलासा देणाऱ्या या बातमीमुळे पनवेल उरण परिसरात असणाऱ्या ठेवीदारांमध्ये समाधानाचे वा-तावरण पाहायला मिळाले.

याबाबत माहिती देताना आमदार बाळाराम पाटील म्हणाले की मी सर्व ठेकेदारांचे अभिनंदन करतो आणि अभिनंदन करत असतानाच त्यांचे मनापासून आभार मानतो. कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे प्रकरण राजकीय आयुध म्हणून वापरण्याचा अनेक लोकांनी प्रयत्न केला. ठेवीदारांना चिथवण्यात आले,मोर्चे काढण्याचा प्रयत्न झाला परंतु या सगळ्या मंडळींना माजी आमदार विवेक पाटील यांना अटक करण्यामध्ये रस होता. ठेवीदारांच्या पैशाशी त्यांना काहीही देणेघेणे नव्हते. आम्ही मात्र ठेवीदारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिलो व ठेवीदार विमा संरक्षणाचे पैसे त्यांना मिळावे यासाठी कायम प्रयत्नशील राहिलो. त्या प्रयत्नांना यश मिळत असल्याचे पाहून समाधान लाभते.

१३ ऑगस्ट रोजी बँक अवसायानात जाहीर होण्याची प्रक्रिया पूर्ण झाली होती, त्यानंतर अवघ्या सहा महिन्यांमध्ये ठेवीदार विमा संरक्षण अंतर्गत बँकेतील ३८,६०० ठेवीदारांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.वास्तविक या ठेवीदारांपैकी जवळपास ९० टक्के ठेवीदार हे शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे चिथावणीखोर राजकारण करून शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते पक्षापासून दूर नेण्याचे प्रयत्न अनेक मंडळींनी केले. परंतु त्यांचे मनसुबे पूर्ण करण्यात त्यांना यश आले नाही, कारण आमच्या कार्यकर्त्यांनी आमच्यावर विश्वास ठेऊन संयम दाखवला त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. पुढच्या आठ दिवसात वाटपाला सुरुवात होणार असून दीड महिन्याच्या कालावधीत सर्व ठेवीदारांचे पैसे मिळणार आहेत.


## जाहीर नोटीस

जय भवानी मच्छिमार सहकारी संस्था मर्या. मुरुड जंजिरा ता.मुरुड, जि.रायगड संचालक मंडळ निवडणूक सन २०२१-२२ ते २०२६-२७ या करिता निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा दि.११/२/२०२२ सकाळी ११.०० वाजता सहायक निबंधक सहकारी संस्था, मुरुड जि.रायगड यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर व संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. तसेच नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) दिनांक ११/०२/२०२२ ते दिनांक १७/०२/२०२२ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत मिळू शकतील. (सहायक निबंधक सहकारी संस्था, मुरुड, जि.रायगड यांचे कार्यालयात)

(टिप :- निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम सहायक निबंधक सहकारी संस्था मुरुड यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर व संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आला आहे.)

**सही/-**
**(प्रमोद शं. वाघमारे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**जयभवानी मच्छिमार सहकारी संस्था मर्या. मुरुड, जि.रायगड**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## डोलवी एमआयडीसी प्रकल्प रद्द करा : आ.जयंत पाटील

करण्यात आली होती. या वेळी आमदार जयंत पाटील, आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यक्षिल पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पंचायत समिती सदस्य प्रदिप म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते अरुण शिवकर, वैशाली पाटील, प्रसाद भोईर, संजय डंगर सरपंच अपर्णा कोठेकर. उपसरपंच दर्शना पाटील पाटील आदिसह शेतकरी उपस्थित होते.

येथील शेतकऱ्यांची लढाई वेगळी आहे राजकारणातील मतभेद बाजुला ठेवुन येथील लढाई लढायची आहे पेण तालुक्यातील शेतकऱ्यांनी सेझ विरुध्दची लढाई जिकंली आहे. जेएसडब्लु कंपनीने येथील जमीनीची मागणी केली असेल तर आपली लढाई कंपनी विरोधात आहे. स्थानिकांना कंपनीत प्राधान्य मिळाले पाहीजे.या जिल्ह्यातील दोन मंत्र्यानी ही एमआयडीसी रद्द करावी असे अवाहन आमदार जयंत पाटील यांनी या वेळी केले तर एमआयडीसी रद्द करावी या संदर्भात विधान परिषदेत आवाज उठविणार आसल्याचे आमदार जयंत पाटील यांनी या वेळी सांगितले.

शेतकऱ्यांची एकजुट महत्वाची आहे. पुर्वजानी जपणुक केलेल्या जमीनी वारसा हक्काने राखायच्या आहेत. पुढच्या पिढीला वारसा हक्क मिळाला पाहीजे येथील एमआयडीसी रद्द करा नहीतर येथील शेतकरी सरकारला ऐकणार नाहीत. विधान सभेत हा प्रश्न मांडणार आसल्याचे आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले. आपल्या जमिनी भलत्याच कोणाला आवडल्या म्हणुन देणार नाही आपल्या जमिनी आपल्याला राखायच्या आहेत. सरकारने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता अधिसुचना काढली आहे. सरकार आपले मायबाप आहे हे त्यांना सिध्द करायचे आहे. सरकारला मायेचा पाझर फोडल्याशिवाय राहाणार नाही नोटीसी रद्द होई पर्यत येथील शेतकरी थांबणार नसल्याचे माजी आमदार धैर्यक्षिल पाटील यांनी या वेळी सांगितले. या सभेत सामाजिक कार्यकर्ते अरुण शिवकर, वैशाली पाटील आदिनी आपले मनोगत व्यक्त केले.

## महाड व पोलादपूर तालुक्यातील जनतेच्या भावना आदराच्या

पाठपुरावा केल्याचे राज्यातील सुज्ञ जनतेला पूर्णपणे माहिती आहे. महाविकास आघाडीमध्ये समन्वयाची भूमिका ठेवून महाड आणि पोलादपूर तालुक्यात वावरताना पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी महाविकास आघाडीतील घटक पक्षाच्या नेते व कार्यकर्त्यांना नेहमीच सोबत घेतल्याचे दोन्ही तालुक्यातील जनतेने अनुभवले आहे असे मत पोलादपूर तालुका महिला अध्यक्षा प्रतिभा पं.पवार यांनी व्यक्त केले.

रायगड जिल्ह्यातील पर्यटन विकासाचे क्षेत्र मोठे असताना पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथे नरवीर तानाजी मालुसरे, साखर येथील नरवीर सूर्याजी मालुसरे तसेच घागरकोंडच्या झुलता पुलासाठी १० कोटींचा निधी मंजूर केला असून कुडपण सारख्या दूर्गम क्षेत्रामध्ये पाहणी करून मोठ्या प्रकारचे पर्यटनविषयक प्रकल्प आणण्याची मानसिकता व्यक्त करण्याच्या ताईंच्या भुमिकेचे पोलादपूर तालुक्याने स्वागत केले आहे,असे यावेळी शहर अध्यक्ष अजित खेडेकर यांनी सांगितले.

महाड आणि पोलादपूर तालुक्यातील जनता विकासासाठी पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्या विकासात्मक कार्याच्या भुमिकेकडे अपेक्षेने पाहात असून यापूर्वीचे रायगड जिल्ह्यातील महाड येथील आमदार असलेले पालकमंत्री स्व.प्रभाकर मोरे हे रायगडचे पालकमंत्री असताना त्यांनी ज्याप्रमाणे तत्कालीन सर्वपक्षियांना सोबत घेऊन काम केले होते; त्याचप्रमाणे ना.अदितीताई तटकरे यांनी रायगड जिल्ह्यात सर्वपक्षियांना विशेषत: महाविकास आघाडीच्या नेत्यांना सोबत घेऊन महाविकास आघाडीची विकासकामे जनतेपर्यंत पोहोचविण्याची भुमिका घेतली आहे. रायगडच्या पालकमंत्री म्हणून ना.अदितीताईंची भुमिका आणि कारकिर्द संपूर्णत: महाआघाडी सरकारच्या भुमिकेशी अनुकूल असताना सत्तेतील प्रमुख पक्ष असलेल्या शिवसेनेच्या सर्व नेते व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काँग्रेसच्या नेत्यांसोबत राहून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनाही त्या आधार देताना महाड आणि पोलादपूर तालुक्यातील कार्यकर्ते मंडळींनी पाहिले असल्याने ताईंबद्दल आदरभाव वाढीस लागला आहे.

रायगडच्या पालकमंत्री म्हणून ना.अदिती तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांपेक्षा अधिककाळ महाविकास आघाडीच्या नेते व कार्यकर्त्यांमध्ये घालवून महाविकास आघाडीसरकारच्या कामात समन्वयाची भुमिका घेत असल्याचे महाड आणि पोलादपूर या दोन्ही तालुक्यातील जनतेला माहिती असल्याने आगामी काळात येथील जनता रायगडच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांना मोठ्या प्रमाणात सेवेची संधी मिळण्यासाठी अपेक्षा धरून असल्याचे यावेळी पोलादपूर तालुका महिला अध्यक्षा प्रतिभा पं.पवार यांनी सांगितले.

## सुधागड तालुक्यातील उन्हेरे बुद्रुक येथे एका घराला आग

शिवमूर्ती पवार व गावकरी उपस्थित होते. ही आग नक्की कशाने लागली याचे कारण समजलेले नाही. मात्र आग शॉर्ट सर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज राम यांनी व्यक्त केला. गावकऱ्यांनी मिळून ही आग आटोक्यात आणली. मात्र तो पर्यंत मोठे नुकसान झाले होते.

## कुपोषणमुक्त मुंबईसाठी ७१ नागरी बाल विकास केंद्रे कार्यान्वित : ॲड.यशोमती ठाकूर

बाल विकास केंद्र (णउऊउ) सुरू करण्याचे निर्देश महिला व बाल विकास ड. यशोमती ठाकूर यांनी दिले होते. मंत्री ॲड. ठाकूर यांच्या निर्देशानुसार मुंबईतील एम पूर्व व एम पश्चिम या प्रभागांतर्गत चेंबुर, गोवंडी, शिवाजीनगर, मानखुर्द, ट्रॉम्बे व मुलुंड पूर्व या ६ प्रकल्पांमध्ये एकूण ७१ नागरी बाल विकास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. त्यापैकी पहिल्या चेंबुर नागरी बाल विकास केंद्र येथे उद्घाटनप्रसंगी आयुक्त रुबल अग्रवाल यांनी अंगणवाडी क्षेत्रातील अति तीव्र कुपोषित मुलांच्या पालकांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. तसेच या मुलांच्या वजनात वाढ होऊन त्यांचे श्रेणीवर्धन होण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीने तयार केलेला ऊर्जायुक्त पोषण पूरक आहार (energy dense nutritious food) मुलांच्या पालकांना सुपूर्द करण्यात आला.

नागरी बाल विकास केंद्रातून अति तीव्र कुपोषित मुलांना दिवसभर ठेवण्यात येणार असून प्रत्येक २ तासांनी ऊर्जायुक्त पोषण पूरक आहार भरविण्यात येणार आहे. त्यांच्या नियमित जेवणासोबत संपूर्ण दिवसांत ९२ ग्राम एवढया आहार त्यांना देण्यात येईल. पुढील ३ महिने त्यांचे अंगणवाडी सेविका, मुख्य सेविका यांच्यामार्फत नियमित निरीक्षण व नियंत्रण करण्यात येणार आहे. या मुलांचे वजन साधारण श्रेणीत आल्यानंतर नागरी बाल विकास केंद्रातून सोडण्यात येईल. तसेच आरोग्य विभागाकडून आवश्यक ते औषधोपचार करून घेण्यात येणार आहेत. अशाप्रकारे ७१ नागरी बाल विकास केंद्रांच्या माध्यमातून कुपोषितमुक्त मुंबईसाठी महिला व बाल विकास मंत्री ड. यशोमती ठाकूर यांनी एक पाऊल पुढे टाकले आहे. महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनातून मुंबईतील ही कुपोषित मुले लवकरच सुपोषित होऊन सामान्य मुलांप्रमाणे आनंदाने पुन्हा नाचू- बागडू लागतील असा विश्वास एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त श्रीमती रुबल अग्रवाल यांनी व्यक्त केला आहे.


## ग्रामपंचायत आकुर्ली
### मु.आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड

जा.क्र.२९२/ग्रा.प./आस्था २०२२
दिनांक : ११/०२/२०२२

### जाहीर निविदा

यांचेकडील विकास कामांच्या अंतर्गत खालील कामांची निविदा योग्य त्या स्थानिक नोंदणीकृत ठेकेदार ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल.

वरील कामाची निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांकापर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | ०९/०२/२०२२ | १०.०० सकाळी | १५/०२/२०२२ | १२.०० दुपारी |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट मिळवण्याचा कालावधी | ०९/०२/२०२२ | १०.०० सकाळी | १५/०२/२०२२ | १२.०० दुपारी |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी | ०९/०२/२०२२ | १०.०० सकाळी | १५/०२/२०२२ | १२.०० दुपारी |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | १६/०२/२०२२ | १२.०० दुपारी | | |

ग्रामपंचायत आकुर्लीसाठी सन २०२१-२०२२ या सालाकरिता ग्रामपंचायत फंडातून वस्तू खरेदी करावयाच्या आहेत. त्यासाठी मान्यताप्राप्त पुरवठादारांकडून दि.११/०२/२०२२ ते १५/०२/२०२२ रोजी दुपारी १०.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात जाहीर दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदरचे दरपत्रक दिनांक १६/०२/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता निविदा धारक अगर त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र. | वस्तू/साहित्याचे नाव | लेखाशिर्षक | सन | नग |
|---|---|---|---|---|
| १ | स्ट्रीट लाईट पोल | ग्रामनिधी | २०२१-२०२२ | |
| २ | स्ट्रीट लाईट ट्युब | ग्रामनिधी | २०२१-२०२२ | |
| ३ | वायर | ग्रामनिधी | २०२१-२०२२ | |

**सही/-**
**सौ.भारती सचिन पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे**
**ग्रामसवेक**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता.पनवेल, जि.रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नागोठणे ग्रामपंचायतीकडून पत्रकार ॲड. महेश पवार यांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील वरिष्ठ पत्रकार व नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश पवार यांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाची परिक्षा नुकतीच यशस्वीरित्या उत्तीर्ण केली. ॲड. महेश पवार यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल नगोठणे ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांच्या हस्ते त्यांचा नुकताच ग्रामपंचायत कार्यालयात सत्कार करण्यात आला.

यावेळी उपसरपंच मोहन नागोठणेकर, आर.पी.आय. चे कोकण नेते व्ही.के.जाधव, नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, ग्रामपंचायत सदस्य अखलाक पानसरे, ज्ञानेश्वर साळुंखे, ग्रामविकास अधिकारी मोहन दिवकर, विजय शहासने व लेखनिक प्रमोद चोगले आदींसह ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते. स्थानिक राज्य बार कौन्सिलची वकिलीची सनद घेतल्यानंतर वकिली व्यवसायाचे सराव प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच वकिली व्यवसायात कार्यरत राहण्यासाठी बार कौन्सिल ऑफ इंडियाकडून संपूर्ण देशात एकाचवेळी परिक्षा (–खइए) घेण्यात येते. ॲड. महेश पवार यांनीही महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलची सनद घेतल्यानंतर बार कौन्सिल ऑफ इंडियाकडून गेल्या वर्षी ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी घेण्यात आलेली ही परिक्षा नवी मुंबईतील परिक्षा केंद्रात दिली होती. त्या परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहीर करण्यात आला. याच परीक्षेत पत्रकार ॲड. महेश पवार यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. पत्रकार म्हणून कार्यरत असतांना माझे अनेक सत्कार झाले असून वकील म्हणून ग्रामपंचायतीकडून म्हणजेच गावाकडून झालेला हा माझा पहिलाच सत्कार असून या सत्काराला एक वेगळे महत्व असल्याचे मी समजतो. यापुढे पत्रकारितेबरोबरच वकिलीचा सराव करत या क्षेत्रातही कार्यरत राहणार असल्याचे ॲड. महेश पवार यांनी सांगितले.



# पत्रकारांच्या मागण्यांसाठी 'एबीजेएफ' राष्ट्रीय उपाध्यक्ष फिरोज पिंजारी १ मे २०२२ रोजी दिल्लीत करणार आमरण उपोषण

## पत्रकार कल्याण महामंडळ, आरोग्य कार्ड, टोलमाफी व डिजिटल मिडीयाच्या पत्रकारांना ॲक्रिडेशन कार्ड देण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी राष्ट्रीय पत्रकार कल्याण महामंडळ स्थापन करावे, पत्रकारांसाठी स्वतंत्र आरोग्य कार्ड असावे, बातमीसाठी जाणाऱ्या पत्रकारांना टोलमाफी करावी व डिजिटल मिडीयाच्या पत्रकारांना देखिल ॲक्रिडेशन कार्ड देण्यात यावे, अशी मागणी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन (–इगत्र) च्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी व राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत केंद्र सरकारकडून लवकरात लवकर निर्णय घेण्यात आला नाही तर राष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत दि. १ मे २०२२ पासून दिल्ली जंतर–मंतर येथे आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा केपी न्यूज चैनल एडीटर इन चिफ फिरोज पिंजारी यांनी दिला आहे.




याबाबत बोलताना पत्रकार फिरोज पिंजारी म्हणाले की, आज लोकशाही न्यायव्यवस्था व पत्रकारांमुळेच जिवंत आहे. शासनाच्या योजना जनतेंपर्यंत पोहचविण्यापासून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देणे, रंजल्या–गांजल्यांसाठी आवाज उठविणे, भ्रष्ट अधिकारी व नेत्यांना चाप बसविण्याचे काम पत्रकार आपल्या लेखणीद्वारे करीत आहेत. पत्रकार हा प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल मिडीयाचा असला, तरी तो पत्रकारच आहे, तरी अशा समाजासाठी जगणाऱ्या घटकाला (समाजयोध्दा) शासकीय योजनांचा लाभ देण्यात आलाच पाहिजे, असे सांगतानाच आता पत्रकारांनी एकत्रित झाले पाहिजे, असेही आवाहन अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा केपी न्यूज चैनल एडीटर इन चिफ फिरोज पिंजारी यांनी केले आहे.

पत्रकाराची आर्थिक परिस्थिती जेमतेम असते, त्यातच बँका त्याला कर्ज देत नाहीत. बातमीदारीतून कुटुंब चालविणे ही अवघड असते त्यामुळे राष्ट्रीय पत्रकार कल्याण महामंडळाची निर्मिती करण्यात यावी, अशी मागणी पत्रकार फिरोज पिंजारी यांनी केली आहे. ते पुढे म्हणाले की, राष्ट्रीय पत्रकार कल्याण महामंडळ उभारून त्या माध्यमातून 'मुद्रा लोन'च्या पार्श्वभूमीवर ५० हजार ते १० लाख रुपयांपर्यत कर्ज द्यावे. या कर्जातून लहान–सहान व्यवसाय करून पत्रकार आपल्या रोजी–रोटीचा प्रश्न मार्गी लावून तो आत्मनिर्भर बनेल, असे पिंजारी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पत्रकारांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्ण विचार करावा, अन्यथा पत्रकारांना आंदोलनाचा मार्ग चोखाळावा लागेल. अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनच्या मागण्या पूर्ण न झाल्यास राष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत दि. १ मे २०२२ पासून दिल्ली जंतर–मंतर येथे आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा केपी न्यूज चैनल एडीटर इन चिफ फिरोज पिंजारी यांनी दिला आहे. या उपोषणात फिरोज पिंजारी यांच्यासोबत देशभरातील हजारों पत्रकार सहभागी होतील, अशी माहिती अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य सरचिटणीस खलिल सुर्वे यांनी दिली आहे. पत्रकार खलील सुर्वे पुढे म्हणाले की, १ मार्च पासून संपूर्ण देशात पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनकडून मोहीम राबविण्यात येणार आहे. अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश जी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात राज्यनिहाय बैठका घेवून रणनिती आखण्यात येईल. तसेच महाराष्ट्रात प्रदेशाध्यक्ष डॉ. शरीफ शेख यांच्या नेतृत्वाखाली जिल्हानिहाय बैठका होणार असल्याचे पत्रकार खलील सुर्वे यांनी बोलताना सांगितले.

## म्हसळयात गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांना आदरांजली

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गानसम्राज्ञी भारतरत्न स्वर्गीय लता मंगेशकर यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकमग्न झाला आसतानाच सर्वच घटकामध्ये लतादीदींच्या प्रती आदरयुक्त भावना व्यक्त होण्याच्या दृष्टीने महान गायिकेला श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सार्वजनिक वाचनालय म्हसळाचे पदाधिकारी, कर्मचारी, वाचक सहभागी झाले होते. वाचनालयात लतादीदींच्या फोटो प्रतिमेला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

लतादीदी गेल्याने भारतभूमीचा सूर हरपला.सुमधूर शब्दही हरपला मात्र सुमधूर गीतांच्या माध्यमातून त्या आपल्या सोबत आजन्म रहाणार असल्याची आदरांजली शिक्षण विभागाचे दिपक पाटील यानी सांगितले.यावेळी गटशिक्षणअधिकारी मंगेश साळी यानी स्वर्गीय लतादीदींच्या प्रतिमेला पुष्पहार घालून आभिवादन केले. आदरांजलीचे कार्यक्रमाला सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, हेमंत माळी, सुनिल गायकवाड, एच.बी.इंदुलकर, विनोद सोनावणे, ग्रंथपाल उदय करडे, दिपाली दातार, सायली चोगले, अनिल महामुनकर, अशोक बाक्कर, धनंजय सरनाईक, अनिल बेडके, किशोर पैलकर, अ.सलाम कौचाली व अन्य वाचक उपस्थित होते.

## व्यावसायिकाची फसवणूक करणाऱ्या महिलेविरुध्द गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चित्रपटात काम मिळवून देण्याच्या बहाण्याने एका महिलेने खारघर मधील एका व्यावसायिकाकडून दोन लाख रुपये उकळून त्यांना त्यांचे पैसे परत न देता त्यांना धमकावल्याचा प्रकार घडला आहे. प्रियंका (सिमा) काळेल असे या महिलेचे नाव असून तिने अजित पवार चुलत सासरे असल्याचे आणि डायरेक्टर पितांबर काळेल तिचे सासरे असल्याची देखील थाप मारल्याचे उघडकीस आले आहे. सदर महिलेविरोधात खारघर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे. दरम्यान, सदर महिलेने अशाच पध्दतीने अनेकांची फसवणूक केली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

सदर प्रकरणातील तक्रारदार श्रीकृष्ण गोसावी पुण्यात राहण्यास असून त्यांचा प्रॉपर्टी कन्सलटन्सी आणि शेअर मार्केटींगचा व्यवसाय आहे. डिसेंबर २०२० मध्ये त्यांची प्रियंका काळेल हिच्यासोबत खारघरमधील लॅन्डमार्क बिल्डींगमध्ये ओळख झाली होती. त्यावेळी प्रियंकाने ती फिल्म प्रॉडक्शनचे काम करत असल्याचे सांगितले होते. त्यावेळी गोसावी यांनी त्यांच्या १३ वर्षीय मुलीला चित्रपटात काम करण्याची इच्छा असल्याचे सांगितले होते. त्यानंतर प्रियंका काळेल हिने रणझुंज नावाचा मराठी सिनेमा बनवत असून या सिनेमांमध्ये वया प्रमाणे ६, १२ आणि १८ वर्षे असे रोल असल्याचे गोसावी यांना सांगितले होते. तसेच सदर सिनेमामध्ये सलमान खान प्रमुख पाहुणा कलाकार म्हणून काम करणार असल्याचे सांगून त्यांच्या मुलीला या सिनेमात काम करण्याची संधी देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच त्यांच्या मुलीचे फोटोग्राफ आणि व्हिडीओ पाठवून देण्यास सांगितले होते. त्यावेळी प्रियंका हिने अजित पवार तिचे मावस सासरे तर डायरेक्टर पितांबर काळेल तिचे सासरे असल्याचे सांगून गोसावी यांच्यावर छाप पाडली होती. काही दिवसानंतर प्रियंका काळेल हिने गोसावी याना फोन करुन तिला एडिटींगचे मशिन्स घेण्यासाठी पाच लाख रुपये कमी पडत असल्याचे सांगून गोसावी यांच्याकडे ५ लाख रुपयांची मागणी केली. आपल्या मुलीला सिनेमामध्ये काम करण्याची संधी मिळत असल्याने गोसावी यांनी प्रियांकाला दोन लाख रुपये दिले होते. सदर रक्कम १० दिवसात परत करण्याचे आश्वासन प्रियंकाने गोसावी यांना दिले होते. त्यामुळे गोसावी यांनी १० दिवसानंतर प्रियंकाला फोन करुन आपल्या पैशांची मागणी केली असता, तिने वेगवेगळी कारणे सांगून टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. अखेर प्रियंकाने जाणीवपूर्वक खाडाखोड करुन दोन लाख रुपयांचा चेक गोसावी यांना दिला. यानंतर सदर चेक त्यांनी बँकेत टाकला असता प्रियंकाच्या खात्यात पैसे नसल्याचे त्यांना समजले. त्यानंतर गोसावी यांनी प्रियंका हिची माहिती काढली असता ती फसवणूक करत असल्याचा संशय त्यांना आला. त्यामुळे गोसावी यांनी डायरेक्टर पितांबर काळेल यांच्याशी संपर्क साधल्यानंतर पितांबर काळे तिचे सासरे नसल्याचे त्यांना समजले. त्यानंतर प्रियंका काळेल हिने गोसावी यांच्या मोबाईलवर संपर्क साधून त्यांच्याशी गोड बोलून त्यांना ब्लॅकमेल करुन फसवण्याचा प्रयत्न केला. मात्र, गोसावी यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर देखील गोसावी यांनी प्रियंकाकडे पैशाची मागणी केल्याने तीने टेरेसवरुन उडी मारुन आत्महत्या करण्याची धमकी दिली. तसेच त्यांचे सर्व रेकॉर्ड तिच्याकडे असल्याचे सांगून त्यांना ब्लॅकमेल करण्याची धमकी दिली. त्यानंतर गोसावी यांनी प्रियंका विरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## न्हावाशेवा पोलिस ठाण्यात हळदी कुंकू समारंभ संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदरातील न्हावाशेवा पोलिस ठाण्याच्या वतीने पोलिस ठाण्यात हळदी – कुंकू समारंभ उत्साहात पाडण्यात आला.यावेळी न्हावाशेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर भटे, पोलिस हवालदार मानसी तांबोळी, सिमा घरत, गौरी देशपांडे, नाहिदा ठाकूर, हेमलता पाटील, सुमन पाटील यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

महिलांना हळदी –कुंकू करून भेट व वस्तू देण्यांत आल्या. कांचन राजेश पाटील, संगिता प्रशांत पाटील, अफशा मुकरी, नाहिदा ठाकूर, सुजाता कडू, संगिता पवार, अनिता घरत, उरण सामाजिक शैक्षणिक व संसृतिक संस्थेच्या पदाधिकारी, दक्षता समितीच्या सर्व सभासद, बचत गट सदस्या, तृप्ती भोईर, नयना पाटील, कल्याणी दुखंडे, नीलिमा थळी, दीपा शिंदे, सामिया बुबेरे, रोहिणी जाधव, देवयानी घरत, कनिष्का नाईक, जेनिफर जयराज, स्वाती देशमुख, सुवर्णा भोईर, मयुरी ओव्होळ, रेणुका शिंदे, किरण टिके, सिमा डोंगरे, महिला पोलिस, कर्मचारी आदी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की श्री. निलेश नारायण राणे, प्लॉट नंबर १०१, रूम. नंबर. १०२, साई शृत को – ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी एलटीडी. पहिला मजला, आसुडगाव, ता. जि. रायगड. पिन नंबर ४१०२०६. यांचे सदर सदनिकेचे खरेदी खत कागदपत्र ०५/०६/२०२१ रोजी हरविले / गहाळ झाले आहे. तसेच याची तक्रार खान्देशवर पोलीस स्टेशन मध्ये ०३/०८/२०२१ या दिवशी देण्यात आली आहे, कोणालाही वरील नमूद कागदपत्र सापडल्यास १५ दिवसाच्या आत ९८७०५५८१९७ / ९६६४९७८४२९ या क्रमांकावर कळविण्यात यावे.

---

ॲड.प्रमिला मोरेश्वर ठाकूर / पाटील

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील फौजदारी न्याया.साहेब यांच्या कोर्टा समोर

फौ.चौ.अर्ज क्र.१४१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१४/०३/२०२२

श्री.भरत धर्मा पाटील
वय : ५५ वर्षे, धंदा : व्यवसाय
मु.कानपोली, ता.पनवेल, जि.रायगड
विरुद्ध
ग्रामपंचायत कानपोली
ता.पनवेल, जि.रायगड

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार भरत धर्मा पाटील यांची बहिण कै.बेबी धर्मा पाटील या दि.१९/०३/२०१४ साली मौजे : कानपोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तसेच अर्जदारास सदरील अर्ज मे.कोर्टात दाखल केले आहे. सदरील मृत्यूच्या नोंदी संदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास १५ दिवसात हरकत कळवावी तशी हरकत आली नाही तर सदरील नोंदी संदर्भात कोणाचीही हरकत नसल्याची नोंद घेवून पेपर मे.कोर्टात दाखल करण्यात येईल.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

---

अर्जदारातर्फे वकील
ॲड.वर्षा पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.१२७/२०२२
ने.ता.२८/०२/२०२२

श्री.राजपाल सिंग धाचंक
फ्लॅट नं.५०७, प्लॉट नं.२७, सेक्टर ९,
रिद्धी सिद्धी रेसिडेन्सी, उलवा नोड, वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत वहाळ उलवे नोड
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सर्व लोकांस जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी श्री.राजपाल सिंग धाचंक हे मौजे फ्लॅट नं.५०७, प्लॉट नं.९, रिद्धी सिद्धी रेसिडेन्सी, उलवा नोड, वहाळ २७, पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची मुलगी कु.हरजोत सिंग धांचक हिचा जन्म दि.११/१२/२०१७ रोजी मौजे फ्लॅट नं.५०७, प्लॉट नं.२७, सेक्टर नं.९, रिद्धी सिद्धी रेसिडेन्सी, उलवा नोड, वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला असून तिच्या जन्माची नोंद संबंधित ग्रुप ग्रामपंचायत वहाळ उलवे नोड यांच्या कार्यालयामध्ये अनावधानाने राहून गेली आहे.

त्याअर्थी अर्जदार यांची मुलगी कु.हरजोत सिंग धांचक हिच्या जन्माची नोंद होवून तसा जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार यांची मुलगी कु.हरजोत सिंग धांचक हिचा जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याबाबत केलेल्या अर्जास कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात आठ दिवसाच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जावर पुरावा घेवून त्यास कु.हरजोत सिंग धांचक हिचा जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश पारिक करील याची दखल घ्यावी.

आज दि.१०/२/२०२२ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.राव साहेब कोर्ट
अर्जदारांचे वकील श्री.एकनाथ जी. खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

१) श्रीमती.रजनी सतीश पाटील, वय : ३९ वर्षे
२) कु.रोशनी सतीश पाटील, वय : १६ वर्षे
३) कु.संदेश सतीश पाटील, वय : १४ वर्षे
क्र.२ व ३ यांची अज्ञान पालन करणार आई
श्रीमती.रजनी सतीश पाटील
सर्व रा.७२/४, वरची आळी, दुर्गा माता मंदिराजवळ,
रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.सतीश कृष्णा पाटील हे दि.०४/०५/२०२१ रोजी निकम परमार हॉस्पिटल, पनवेल येथे मयत झाले आहेत. कै.सतीश कृष्णा पाटील यांचे नावे ॲक्सीस बँक, शाखा कळंबोली, ता.पनवेल या बँकेमध्ये खाते क्र.९०९०१००३४४६५६७२ मध्ये रक्कम रु.२,४६४/– (अक्षरी रुपये दोन हजार चारशे चौसष्ट मात्र) आहेत.

अर्जदार हे कै.सतीश कृष्णा पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.११/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : मालाठे, ता.तळा, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आम्ही सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : मालाठे, ता.तळा, जि.रायगड येथील मिळकत**

| भोगवटाधारकाचे नाव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ | आकार रु. |
|---|---|---|---|
| पांडुरंग भागोजी ठमके व इतर | ४६५ | ०–०६–००<br>पो.ख.०–१७–००<br>एकूण ०–२३–०० | ०.०३ |

तरी सदर मी श्री.राजेंद्र माधव जोशी विकत भोगवटादार यांच्याकडून खरेदी करीत असून बयाणा पावती झाली आहे. तरी मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा ईजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.११/०२/२०२२

**सही/–**
**श्री.राजेंद्र माधव जोशी**
**मो.नं.७६२०७२३०६३**

---

मा.सोनवणे सो
वकील : ॲड.सचिन अं. म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.११९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०३/२०२२

सौ.सुलोचना सुरेश टेंबे
वय : ५६ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.घर क्र.३७, मोठा खांदा गाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ मुलगा कै.निलेश सुरेश टेंबे, हे दिनांक १९/१०/२०२१ रोजी मु.घर क्र.३७, मोठा खांदा गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे अविवाहित मयत झालेल्या आहेत. त्यांचे खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**घर क्र.३७, मोठा खांदा गाव,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

वरील अर्जदार हे कै.निलेश सुरेश टेंबे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१०/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.राव साहेब कोर्ट
अर्जदारांचे वकील श्री.एकनाथ जी. खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०२३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०३/२०२२

१) श्री.किसन वसंत पाटील
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.यशवंत वसंत पाटील
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.वसंत महादू उर्फ महादेव पाटील हे दि.२८/०६/२०१५ रोजी मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून, त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| कळंबोली–७२ | ३९ | १ | ०–१७–४ |
| | ३९ | ४ | ०–०८–८ |
| | ३९ | ९+१०+११ अ | ०–४५–५ |
| कळंबोली–७२ | ४७ | ७ अ | ०–०६–२ |
| | ४१ | ६ | ०–३५–५ |
| कळंबोली–७२ | १८ | १ | ०–१३–४ |
| कळंबोली–७२ | ४१ | १६ | ०–०१–३ |
| | ४१ | १७ ब | ०–०४–१ |
| | ४४ | क | ०–०१–० |
| | १२३ | ३ पै | ०–०७–४ |
| कळंबोली–७२ अ | ७५ | ६ | ०–२९–८ |
| | ५ | १३४ | ०–२४–८ |
| | ६ | १३५ | ०–३१–० |
| कळंबोली–७२ अ | ४५ | ४+५+९+७ | ०–४५–८ |
| कळंबोली–७२ ब | ५७ | १ पै | ०–१७–१ |
| कळंबोली–७२ ब | ६० | १ ब | ०–१८–२ |
| | ६६ | २ | ०–२५–९ |
| कळंबोली–७२ क | ५२ | ७ | ०–२१–७ |
| कळंबोली–७२ क | ७७ | १ | ०–५१–४ |
| कळंबोली–१६७ | २५ | ३ अ | ०–४४–६ |
| | २५ | ३ ब | ०–२६–८ |
| कळंबोली–४२ | ४० | ६ अ | ०–११–४ |
| कळंबोली–२३ | ७५ | ७ | ०–२१–५ |

अर्जदार हे कै.वसंत महादू उर्फ महादेव पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.११/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करणाऱ्या इसमाविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. एक ३५ वर्षीय महिला ही शहरातील एका लॉजमध्ये असताना त्या ठिकाणी अनोळखी इसम जा–वून त्याने रुमचा दरवाजा वाजवून सदर महिलेस मदत देण्याच्या बहाण्याने दरवाजा उघडण्यास लावून आपले व पतीमधील वादविषयी सहानुभूती दाखविण्याच्या बहाण्याने सदर महिलेच्या हातास धरुन मुझे आपको गले लगाना है! असे बोलून स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल अशी कृती करून सदर महिलेचा विनयभंग केला म्हणून या महिलेने सदर अनोळखी इसमा विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## बेस्ट टिचर ॲवॉर्ड विजेते सहदेव कापसे यांचा विशेष सन्मान



**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

अविष्कार फौंडेशन सामाजिक व एज्युकेशनल संस्था कोल्हापूर यांच्या वतीने बेस्ट टिचर अँवाँर्ड देऊन सन्मानित करण्यात आलेले बेस्ट टिचर सहदेव कापसे यांचा कोकणचे भाग्यविधाते खा. सुनिल तटकरे यांच्या हस्ते रोहे तालुक्यातील वरसगाव ग्रा.पंचायतीचे वतीने संपन्न झालेल्या कार्यक्रमात विशेष सन्मान करण्यात आला आहे. ग्रा.पंचायत वरसगाव यांच्या वतीने विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा खा.सुनिल तटकरे यांच्या हस्ते संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमातंर्गत वरसगाव प्रा.शाळा तिसे येथील विषय शिक्षक व वरसगाव गावचे सुपुत्र व बेस्ट टिचर ॲवॉर्ड विजेते सहदेव कापसे यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला आहे. जि.प.सदस्य दयाराम पवार रोहा पं. स.सदस्या सिद्धि राजिवले मा.पं.स.माजी सभापती सुनिता महाबळे जेष्ठ नेते रामचंद्र चितळकर, गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे जेष्ठ नेते प्रकाश थिटे, नारायण धनवी, बाबूराव बामणे, तालुका महिला अध्यक्ष प्रितम पाटील, जि.प.गट अध्यक्ष नरेंद्र जाधव, पं.स.गण अध्यक्ष मनोज शिर्के, राकेश शिंदे, संजय राजिवले, पंचक्रोशीतील सर्व सरपंच यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

# ‘गोल्फ कोर्स’च्या कामासाठी टेकडीवर विना परवानगी खोदकाम

## पनवेल प्रांत विभागाकडून ४ जेसीबी, २ डंपर जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील ‘गोल्फ कोर्स’च्या धामोळे पाड्यालगत असलेल्या नैसर्गिक टेकडीवर खोदकाम करताना परवानगी न घेता खोदकाम करीत असल्याने पनवेल महसूल विभागाने कारवाई करुन ४ डंपर आणि २ जेसीबी सील केल्याने पर्यावरण प्रेमी समाधान व्यक्त करीत आहेत.



‘सिडको’ने खारघर सेक्टर–२३ आणि २४ मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गोल्फ कोर्ससाठी १८ होलची रचना केली होती. मात्र, यातील काही जमीन वनविभागाची असल्यामुळे ‘सिडको’ने ११ होलचे गोल्फ कोर्स उभारले आहे. गोल्फ कोर्सलगत ‘सिडको’ची काही जमीन राखीव आहे. सदर जमिनीवर सिडकोकडून उर्वरित ९ ‘गोल्फ कोर्स’च्या कामाला दोन दिवसापासून सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, ‘गोल्फ कोर्स’च्या कामासाठी टेकडीवर जेसीबी लावून खोदकाम करुन जमिन सपाटीकरणाचे काम केले जात असल्यामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये नाराजी पसरली होती. दरम्यान, पर्यावरण प्रेमी ‘नेटकनेक्ट फाउंडेशन’चे संचालक बी. एन. कुमार यांनी पनवेल प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. सदर तक्रारीची दखल घेवून कळंबोली सर्कल अधिकारी संतोष कचरे यांच्या पथकाने पाहणी केली असता, खोदकाम करताना कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास येताच २ जेसीबी आणि ४ डंपर सील केल्याने ठेकेदाराचे धाबे दणाणले आहे. उर्वरित ‘गोल्फ कोर्स’च्या कामासाठी टेकडीवर जेसीबी लावल्यामुळे भविष्यात बाजूलाच असलेल्या धामोळे पाड्यातील रहिवाशांना धोका होवू शकतो. सदर विषय घेवून धामोळे पाड्यातील काही ग्रामस्थांनी टेकडीच्या खोदकामाला विरोध केला. मात्र, ग्रामस्थांचा विरोध झुगारुन ‘सिडको’ने खोदकाम केले, असे धामोळे पाड्यातील ग्रामस्थांनी सांगितले.

खोदकाम करताना काही झाडांची अडचण येत असल्यास इतर ठिकाणी पुन्हा रोपण करता येते. मात्र, निसर्गाने दिलेली टेकडी निर्माण होण्यासाठी लाखो वर्षे लागतात, याचा विचार सिडको प्रशासनाने करणे आवश्यक आहे. तसेच वन परिसर लगत असलेल्या टेकडीवर खोदकाम करताना पर्यावरण विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र, सदर जमीन ‘सिडको’ची असल्यामुळे ‘सिडको’ने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

> पनवेल प्रांत अधिकाऱ्याच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आली आहे. टेकडीवर किती प्रमाणात खोदकाम करण्यात आले, याची मोजणी केल्यावर पुढील कारवाई केली जाणार आहे.
>
> **- संतोष कचरे,**
> **सर्कल अधिकारी-कळंबोली**

# गाडीवर नाव प्रेस पण बातमीच बनवता येत नाही

## माणगाव तालुक्यात बोगस पत्रकारांचा वावर?

**दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे**

**माणगाव** : माणगाव तालुक्यात मागील काही दिवसांपासून बोगस पत्रकारांचा वावर मोठ्या प्रमाणात चालू असून काही धंदेवाले व्यापारी वर्गात संताप व्यक्त होत आहे. बाजारपेठत कोणाकडेही जाऊन मी पत्रकार आहे सांगून त्याना धमकावुन सरळ सरळ पैशाची मागणी हा पत्रकार करीत आहे. तसेच मी एका पक्षाचा तालुका, जिल्ह्याचा कार्यकर्ता आहे व पत्रकार सुद्धा आहे माझी पोलिसांजवळ व राजकीय नेत्यांशी वरपर्यंत मोठी ओळख असून तुमची मी वाट लावू शकतो अशाप्रकारे माणगांव तालुक्यात इंदापुर विभागात हा बोगस पत्रकार गेल्या दोन वर्षापासून ब्लॅकमेलिंगचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

गाडीवर प्रेस हे नाव टाकून हा बोगस पत्रकार बाजारपेठेतून गाडी फिरवत असतो तसेच कुठल्याही दैनिकाचे यांच्याकडे वार्ताहार प्रतिनिधी कार्ड नसून तालुका जिल्हा पत्रकार संघटनेत हे सभासद देखील नाही किवा यांनी बातमी देखील कधी लिहिली नाही ती बातमी पेपरात छापलेली देखील नाही. अशा या पत्रकारांवर पोलिसांनी करडी नजर ठेवुन योग्य ती कारवाई करावी तसेच जनतेने सुद्धा अशा पत्रकारापासुन सावध रहावे. बोगस पत्रकार असुन सुद्धा व्यावसायिकदांराकडून खंडणी मागण्याचे प्रकार चालु आहेत. अशा बोगस पत्रकारांवर वेळीच आळा घातला नाही तर आज जे अधिकृत व सातत्याने शोध पत्रकरिता करीत आहेत लिखाण करीत आहेत अशा पत्रकारांचे नाव खराब होत आहे. समाजात वावरणाऱ्या खऱ्या पत्रकरांच्या नावाला काळीमा लागत असून माणगाव तालुक्यातील बोगस पत्रकरांवर माणगांव पोलिसांनी कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

# अमित ठाकरे यांच्या हस्ते ’पेणगड’ कार्यालयाचे उदघाटन ; मनसैनिकांत चैतन्य




**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवा नेते अमित ठाकरे यांच्या हस्ते पेण शहरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या ’पेणगड’ या कार्यालयाचे शुक्रवारी भव्य उद्घाटन करण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पेण तालुका अध्यक्ष रूपेश पाटील यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या पेण शहरातील चिंचपाडा येथील कार्यालयाचे उदघाटन अमित राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज व बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत शहरातून ढोल तश्याच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कल्याणचे आमदार राजू पाटील, नवी मुंबईचे अध्यक्ष गजानन काळे, पेण तालुका अध्यक्ष रुपेश पाटील, महिला तालुका अध्यक्ष निकिता पाटील, महिला आघाडीच्या महाराष्ट्र उपाध्यक्षा स्वाती जाधव, महिला रायगड जिल्हाध्यक्ष सपना देशमुख, उपजिल्हा प्रमुख अंकुश म्हात्रे यांच्या सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यालय उदघाटन निमित्ताने अमित राज ठाकरे शहरात आल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांत उत्साह संचारला होता.

# गावाचा सर्वांगीण विकास हाच एक ध्यास : चेतन जावसेन



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शेतकरी कामगार पक्ष व बोर्ली ग्रामपंचायतीच्या माध्यमातून बोर्ली गावात अनेकविध उपक्रम राबविले जात असून गावाचा सर्वांगीण विकास हाच एक ध्यास असल्याचे प्रतिपादन ग्रामपंचायतीचे सरपंच चेतन जावसेन यांनी ग्रामपंचायत व साळावच्या जे.एस.डब्ल्यू.कंपनी माध्यमातून गावातील जूना बाजार येथे उभारण्यात आलेल्या जलशुद्धीकरण (आर ओ) प्रकल्पाच्या उदघाटन प्रसंगी केले.

बोर्ली ग्रामपंचायत व साळावच्या जे.एस. डब्ल्यू. कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने जूना बाजार येथे उभारण्यात आलेल्या जलशुद्धीकरण प्रकल्पाचे लोकार्पण सोहळा अस्मिता वामन चुनेकर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन, उपसरपंच मतीन सौदागर, मनोहर भोपी, सदस्य गणेश कट, भारती बंदरी, शिंदे मॅडम,भारती पाटील, ग्रामविकास अधिकारी पी.जे.गाडेकर, ग्रामस्थ विशेष करून महिला उपस्थित होत्या. गेल्या अनेक वर्षांपासून फणसाड धरणातून जलवाहिनी द्वारे गावाला पाणीपुरवठा केला जातो आहे.परंतु याठिकाणी जलशुद्धीकरण यंत्रणा नसल्याने शुद्ध पाणी पुरवठ्याची गरज भासत होती.ग्रामपंचायत व जे.एस.डब्ल्यू. कंपनी माध्यमातून हा प्रश्न सुटला असून ५० पैसे प्रती लिटर या अल्प दराने आर ओ पाणी उपलब्ध होणार असल्याचे सरपंच चेतन जावसेन यांनी यावेळी सांगितले.

# स्मशानभूमी गावाच्या मध्यवर्ती भागात हवी ; सन्मित्र ग्रुपची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान हे १८५० मध्ये उदयास आले तेव्हापासून ते आजमितीपर्यंत येथील हिंदू स्मशानभूमी ही गावा–पासून जवळपास चार किलोमीटर अंतरावर असल्याने मयत नेण्यासाठी त्याचप्रमाणे वृद्ध मंडळींना तिथपर्यंत पायी चालत जाण्यासाठी खूपच त्रासदायक ठरत असते. शहरी भागात आणि खेडोपाडी सुध्दा स्मशानभूमी ही गावाच्या अगदी जवळ आहेत. परंतु याच ठिकाणी स्मशानभूमी गावापासून खूप लांब अंतरावर आहे त्यामुळे मृताच्या अंत्यसंस्कारासाठी लाकडांची वाहतूक करणे खूप जिकिरीचे असते. येथील प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सन्मित्र ग्रुपने अनेकदा याबाबत संबंधित अधिकारी वर्गाला निवेदने सादर केली आहेत परंतु त्यास कुठल्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही.



स्मशानभूमी ही गावाच्या मध्यवर्ती भागात असावी ही समस्त माथेरान करांची मागणी आहे. सध्याच्या अस्तित्वात असलेल्या हिंदू स्मशानभूमीत काही वर्षांपूर्वी डिझेल वर चालणाऱ्या शव दाहीनीची सोय उपलब्ध करण्यात आली होती परंतु ही मशिनरी सुध्दा डबघाईला आलेली असल्याने खर्च करण्यात आलेले लाखो रुपये गंगाजळीत गेल्यासारखे आहेत. स्मशानभूमी ही खूपच दूरवर असल्यामुळे इच्छा असून देखील अनेकांना जाता येत नाही. जर स्मशानभूमी गावाच्या मध्यवर्ती भागात आल्यास मृत व्यक्तीला शेवटचा निरोप देण्यासाठी, अंतिम दर्शनासाठी जेष्ठांना सोयीस्कर होऊ शकते. सन्मित्र ग्रुपच्या सदस्यांनी याकामी पुढाकार घेतला असून त्याबाबतचे निवेदन उत्तम प्रशासक तथा कार्यतत्पर मुख्याधिकारी सुरेखा भणगे–शिंदे यांना सादर केले आहे यावेळी सन्मित्र ग्रुपचे चंद्रकांत सुतार, स्वप्नील गोसावी, सुरेश शिंदे, विजय मोरे, महेश जाबरे, सुमित परीठ, योगेश देशमुख, केतन रामाने, विजेंद्र देशमुख, ललित पांगसे, राजू जाबरे, महेंद्र जाबरे, अमर शिंदे, राजेंद्र देशमुख, प्रमोद पाटील, आदेश घाग, योगेश दळवी, तुषार जाबरे आदी उपस्थित होते.

स्मशानभूमी गावाच्या जवळील ठिकाणी असावी याकामी सन्मित्र ग्रुपच्या सदस्यांनी श्रीराम चौकात २०१९ मध्ये उपोषणाचा पवित्रा घेतला होता त्यावेळी तत्कालीन लोकप्रतिनिधींनी, अधीक्षक यांनी आपण निश्चित करत असणारी जागा वनखात्याच्या अखत्यारीत येत आहे असे सांगितले होते. यावर लवकरच काहीतरी तोडगा काढण्यात येईल असे आश्वासन दिले होते परंतु आजतागायत याबाबतीत कोणत्याही संबंधीत खात्याने ठोस भूमिका पार पाडली नाही. त्यामुळे या विषयावर लवकरच काही सकारात्मक विचार केला गेला नाही तर पुन्हा एकदा उपोषणाला सामोरे जावे लागणार असेही या ग्रुपच्या सदस्यांनी सांगितले आहे.

# नेरळ येथील भात खरेदी केंद्रावर भाताच्या पोत्यांचे ढीग ; कळंब येथील गोडाऊन अजूनही भरलेलेच

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील भाताची शेती करणारे शेतकरी यांनी पिकवलेला भात शासनाच्या आधारभूत किमतीने खरेदी केले जाते. कर्जत आणि नेरळ येथे शेतकऱ्यांचा भात मोठ्या प्रमाणात पोहचले असून त्यामुले शासनाची गोडाउन पूर्ण भरले आहेत. त्यामुळे कर्जत आणि नेरळ येथे शासनाने नवीन गोडाउन बांधावे तसेच कळंब येथील भाताच्या पोत्यांनी भरलेले गोडाऊन रिकामे करून द्यावे अशी मागणी शेतकरी करीत आहेत.



शासनाच्या मार्केटिंग फेडरेशन च्या माध्यमातून भाताची आधारभुत किमतीने खरेदी केली जाते. शेतकऱ्यांकडून भाताची खरेदी कर्जत तालुक्यात कर्जत, कडाव आणि नेरळ येथील शासनाने नियुक्त केलेल्या संस्थांकडून केली जात आहे. मात्र कर्जत येथील खरेदी विक्री संघ आणि नेरळ येथील विविध विकास कार्यकारी सोसायटी यांच्याकडून भाताची हमी भावाने खरेदी उपक्रमास शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे कर्जत येथील दोन्ही शासनाची गोदामे भाताच्या पोत्यांनी भरून गेली आहेत. तर नेरळ येथील एकमेव गोदाम देखील भाताने भरून गेले आहे. त्यामुळे भाताच्या पोटी गोदामाच्या बाहेर ठेवली जात आहेत. बदललले हवामान यामुळे पाऊस कधीही येण्याची शक्यता असते. त्यामुळे गोडाऊन बाहेर ठेवलेली भाताची पोटी यावेळी येणाऱ्या पावसाच्या पाण्यात भिजण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने गोळा झालेला भात येथून उचलून न्यावा आणि संभाव्य धोका टाळावा अशी सूचना शेतकरी करीत आहेत.

शासनाने भाताची गोदामे कमी पडत असल्याची परिस्थिती लक्षात घेऊन भाताची साठवण करण्यासाठी नव्याने गोदामे बांधावी अशी मागणी नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी आणि कर्जत खरेदी विक्री संघाने तहसीलदार यांच्याकडे केली आहे. नेरळ सोसायटी कडे तर एकच गोदाम सध्या उपलुब्ध आहे, त्यामुळे कळंब येथे असलेले शासकीय गोदाम खुले करण्याची मागणी केली आहे. कळंब येथील गोदामात गेल्या वर्षी खरेदी करण्यात आणलेले भात अजूनही पडून आहे. ते उचलल्यास साधारण २५०० क्विंटल भाताची साठवण तेथे होऊ शकते आणि त्यामुळे भाताची खरेदी देखील होऊ शकते अशी माहिती शेतकरी देत आहेत.

# गोरखपूर ट्रेन मधून पर्स खेचून पळून जाणाऱ्या चोरट्याला रेल्वे सुरक्षा बलाने पकडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल – गोरखपूर ट्रेन मधून पर्स खेचून पळून जाणार्या चोरट्याला मंगळव–ारी रेलेव सुरक्षा बलाच्या उप निरीक्षक रेणु पटेल आणि त्यांच्या सहकार्यांनी पाठलाग करून पकडले. त्याच्याकडून पर्स आणि चोरलेला मोबाईल हस्तगत केला असून आरोपीला पुढील कारवाईसाठी पनवेल रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.




रेल्वे सुरक्षा बलाच्या उप निरीक्षक रेणु पटेल, सहायक उपनिरीक्षक विजय गोरे, हवालदार विशाल कवले, शिपाई एस एन सैनी हे पनवेल स्टेशन वरील फलाट क्रमांक ७ वर गोरखपूर ट्रेनची तपासणी करत होते. त्याचवेळी कोच नंबर ३ डी मधून चोर, चोर पकडा असा आवाज आल्याने त्यांनी तिकडे धाव घेतली असता एक व्यक्ती पळत असताना दिसली.

त्याचा पाठलाग केला असता ती व्यक्ती रोहा – दिवा गाडीत चढली त्याला पकडून रेल्वे सुरक्षा बलाच्या कार्यलयात आणले. त्याठिकाणी त्याची चौकशी केली असता त्याचे नाव विशाल यादव ( वय २५ वर्षे ) असल्याचे समजले. त्याची तपासणी केली असता त्याच्या जवळ निळ्या रंगाचा २८ हजार रूपये किमतीचा सैमसंग –९ फोन सापडला.

त्याच्यावर कामोठे येथील जाफर इम्रान फक्रुल हसन या व्यक्तीचा फोन आला. त्याला बोलवून घेण्यात आले. त्याच वेळी संतोष रामेश्वर प्रसाद, रा. करंजाडे तेथे आले. त्यांनी आपली पर्स गोरखपूर ट्रेन कोच नंबर ३ डी मधून खेचून नेल्याची तक्रार केली. त्यानी तेथे असलेल्या आरोपीला ओळखले. त्यानंतर पुढील कारवाईसाठी पनवेल रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. आपली पर्स सापडल्याबद्दल त्यांनी उप निरीक्षक रेणु पटेल व त्यांच्या सहकार्यांना धन्यवाद दिले.